# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** भांडेवाडी नागपूर येथे घनकचऱ्यावर प्रक्रिया आणि विल्हेवाट
**{ सार्व.आ.अभि. विभाग }** लावण्यासाठी 500 MTPD+10% सेमी-ऑटोमॅटिक मॉड्यूलर कॉम्पॅक्ट सुविधेचे (इंटिग्रेटेड सिस्टम कंपोस्टिंग आणि एमआरएफ) डिझाइन, वित्तपुरवठा, पुरवठा, स्थापना आणि कमिशनिंग तत्वावर आधारीत निर्माण करणे, तसेच 5 वर्षांच्या कालावधीसाठी देखभाल व दुरुस्ती करणे.

नागपूर शहरातून दररोज १३०० ते १४०० मे. टन प्रतिदिन घनकचऱ्याची निर्मिती होते. नागपूर शहरातून सद्यस्थिती निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे प्रमाण येणाऱ्या पुढील वर्षांमध्ये बऱ्याच प्रमाणात वाढीव राहील. याकरीता घनकचऱ्याचे निर्माण व त्यावरील प्रक्रिया यामधील अंतर याची पूर्तता करण्याचे दृष्टीने भांडेवाडी नागपूर येथे घनकचऱ्यावर प्रक्रिया आणि विल्हेवाट लावण्यासाठी 500 MTPD+10% सेमी-ऑटोमॅटिक मॉड्यूलर कॉम्पॅक्ट सुविधेचे (इंटिग्रेटेड सिस्टम कंपोस्टिंग आणि एमआरएफ) डिझाइन, वित्तपुरवठा, पुरवठा, स्थापना आणि कमिशनिंग तत्वावर आधारीत निर्माण करणे, तसेच 5 वर्षांच्या कालावधीसाठी देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता टीपींग फी करीता लागणारा खर्च मनपा निधीतून करण्याचे आणि निविदा बोलविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक, मनपा यांनी ठराव क्र. ९१/स्थायी समिती/प्रशासक, दिनांक ०२.०६.२०२५ अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे.

प्राप्त मंजूरीन्वये उपरोक्त नमुद कामास्तव निविदा दिनांक १० जून २०२५ ला मागविण्यात आल्या असता, मे. भूमी ग्रीन एनर्जी आणि मे. ऍन्टोनी लारा इनवायरो सोल्युशनस् प्रा. लि. यांच्या निविदा प्राप्त झाल्या. शासन निर्णय दिनांक २७.०९.२०१८ अन्वये दोन्ही निविदाकारांच्या तांत्रिक निविदा दिनांक ०४.०७.२०२५ ला उघडण्यात येवून तपासणीअंती दोन्ही निविदाकार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याने त्यांच्या आर्थिक निविदा दिनांक २४.०७.२०२५ ला उघडण्यात आल्यात. यामध्ये निम्नत्तम निविदाकार मे. भूमी ग्रीन एनर्जी यांची निम्मतम दराची रु. ८४४/- प्रति मे. टन निविदा प्राप्त झाली.

निम्नत्तम निविदाकार मे. भूमी ग्रीन एनर्जी यांना वाटाघाटी करण्याकरीता आणि तांत्रिक प्रस्ताव व आर्थिक पैलूंचे विश्लेषण मागविण्याकरीता दिनांक २८.०७.२०२५ ला प्रत्यक्षात बोलविण्यात येवून त्यांना दिनांक ३०.०७.२०२५ चे पत्राद्वारे कळविण्यात आले. मे. भूमी ग्रीन एनर्जी यांनी दिनांक ०१.०८.२०२५ ला ते सादर केले आणि वाटाघाटीअंती नमुद काम करण्याकरीता अंतीम दर रु. ७७२/- प्रति मे. टन सादर केला. सादर करण्यात आलेले तांत्रिक प्रस्ताव व आर्थिक पैलूंचे विश्लेषणाची तपासणी विभागाद्वारे करण्यात येवून भारतातील इतर शहरांमध्ये सुरु असलेल्या समान कामांच्या दराची तूलना करण्यात आली असता मे. भूमी ग्रीन एनर्जी यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले दर रु. ७७२/- प्रति मे. टन स्विकारहार्य असल्याचे दिसून येते. सदरहू बाब मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त निविदा आर्थिक तपासणी समिती समोर दिनांक ७ ऑगस्ट २०२५ ला ठेवण्यात आली असता त्यांनी मे. भूमी ग्रीन एनर्जी यांचेद्वारे वाटाघाटी अंती सादर केलेले दर रु. ७७२/- प्रति मे. टन ला मान्यता प्रदान केली.

करीता, भांडेवाडी नागपूर येथे घनकचऱ्यावर प्रक्रिया आणि विल्हेवाट लावण्यासाठी 500 MTPD+10% सेमी-ऑटोमॅटिक मॉड्यूलर कॉम्पॅक्ट सुविधेचे (इंटिग्रेटेड सिस्टम कंपोस्टिंग आणि एमआरएफ) डिझाइन, वित्तपुरवठा, पुरवठा, स्थापना आणि कमिशनिंग तत्वावर आधारीत निर्माण करणे, तसेच 5 वर्षांच्या कालावधीसाठी देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता निम्नत्तम निविदाकार मे. भूमी ग्रीन एनर्जी यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले दर रु. ७७२/- प्रति मे. टन ला मान्यता देण्याचा आणि त्यांना Letter of Acceptance देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप:-**

१. विस्तृत माहिती नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

२. प्रस्तावित काम हे सन २०२५-२६ च्या आर्थिक वर्षात पद क्र. A४ ४२ ०१२ ७२२ ०२ (नागरी घनकचरा व्यवस्थापनाची शास्त्रोक्त अंमलबजावणी व इतर प्रकल्प) अंतर्गत करण्यात येईल. प्रकल्प उभारणीनंतर देखभाल दुरुस्ती (O&M/Processing) करीता २०२५-२६ या आर्थिक वर्षांत टिपींग फी करीता रु. ४.०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 234/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 12/08/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार भांडेवाडी नागपूर येथे घनकचऱ्यावर प्रक्रिया आणि विल्हेवाट लावण्यासाठी 500 MTPD+10% सेमी-ऑटोमॅटिक मॉड्यूलर कॉम्पॅक्ट सुविधेचे (इंटिग्रेटेड सिस्टम कंपोस्टिंग आणि एमआरएफ) डिझाइन, वित्तपुरवठा, पुरवठा, स्थापना आणि कमिशनिंग तत्वावर आधारीत निर्माण करणे, तसेच 5 वर्षांच्या कालावधीसाठी देखभाल व दुरुस्ती करणे.

नागपूर शहरातून दररोज १३०० ते १४०० मे. टन प्रतिदिन घनकचऱ्याची निर्मिती होते. नागपूर शहरातून सद्यस्थिती निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे प्रमाण येणाऱ्या पुढील वर्षांमध्ये बऱ्याच प्रमाणात वाढीव राहील. याकरीता घनकचऱ्याचे निर्माण व त्यावरील प्रक्रिया यामधील अंतर याची पूर्तता करण्याचे दृष्टीने भांडेवाडी नागपूर येथे घनकचऱ्यावर प्रक्रिया आणि विल्हेवाट लावण्यासाठी 500 MTPD+10% सेमी-ऑटोमॅटिक मॉड्यूलर कॉम्पॅक्ट सुविधेचे (इंटिग्रेटेड सिस्टम कंपोस्टिंग आणि एमआरएफ) डिझाइन, वित्तपुरवठा, पुरवठा, स्थापना आणि कमिशनिंग तत्वावर आधारीत निर्माण करणे, तसेच 5 वर्षांच्या कालावधीसाठी देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता टीपींग फी करीता लागणारा खर्च मनपा निधीतून करण्याचे आणि निविदा बोलविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक, मनपा यांनी ठराव क्र. ९१/स्थायी समिती/प्रशासक, दिनांक ०२.०६.२०२५ अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे.

प्राप्त मंजूरीन्वये उपरोक्त नमुद कामास्तव निविदा दिनांक १० जून २०२५ ला मागविण्यात आल्या असता, मे. भूमी ग्रीन एनर्जी आणि मे. ऍन्टोनी लारा इनवायरो सोल्युशनस् प्रा. लि. यांच्या

निविदा प्राप्त झाल्या. शासन निर्णय दिनांक २७.०९.२०१८ अन्वये दोन्ही निविदाकारांच्या तांत्रिक निविदा दिनांक ०४.०७.२०२५ ला उघडण्यात येवून तपासणीअंती दोन्ही निविदाकार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याने त्यांच्या आर्थिक निविदा दिनांक २४.०७.२०२५ ला उघडण्यात आल्यात. यामध्ये निम्नत्तम निविदाकार मे. भूमी ग्रीन एनर्जी यांची निम्मतम दराची रु. ८४४/- प्रति मे. टन निविदा प्राप्त झाली.

निम्नत्तम निविदाकार मे. भूमी ग्रीन एनर्जी यांना वाटाघाटी करण्याकरीता आणि तांत्रिक प्रस्ताव व आर्थिक पैलूंचे विश्लेषण मागविण्याकरीता दिनांक २८.०७.२०२५ ला प्रत्यक्षात बोलविण्यात येवून त्यांना दिनांक ३०.०७.२०२५ चे पत्राद्वारे कळविण्यात आले. मे. भूमी ग्रीन एनर्जी यांनी दिनांक ०१.०८.२०२५ ला ते सादर केले आणि वाटाघाटीअंती नमुद काम करण्याकरीता अंतीम दर रु. ७७२/- प्रति मे. टन सादर केला. सादर करण्यात आलेले तांत्रिक प्रस्ताव व आर्थिक पैलूंचे विश्लेषणाची तपासणी विभागाद्वारे करण्यात येवून भारतातील इतर शहरांमध्ये सुरु असलेल्या समान कामांच्या दराची तूलना करण्यात आली असता मे. भूमी ग्रीन एनर्जी यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले दर रु. ७७२/- प्रति मे. टन स्विकारहार्य असल्याचे दिसून येते. सदरहू बाब मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त निविदा आर्थिक तपासणी समिती समोर दिनांक ७ ऑगस्ट २०२५ ला ठेवण्यात आली असता त्यांनी मे. भूमी ग्रीन एनर्जी यांचेद्वारे वाटाघाटी अंती सादर केलेले दर रु. ७७२/- प्रति मे. टन ला मान्यता प्रदान केली.

करीता, भांडेवाडी नागपूर येथे घनकचऱ्यावर प्रक्रिया आणि विल्हेवाट लावण्यासाठी 500 MTPD+10% सेमी-ऑटोमॅटिक मॉड्यूलर कॉम्पॅक्ट सुविधेचे (इंटिग्रेटेड सिस्टम कंपोस्टिंग आणि एमआरएफ) डिझाइन, वित्तपुरवठा, पुरवठा, स्थापना आणि कमिशनिंग तत्वावर आधारीत निर्माण करणे, तसेच 5 वर्षांच्या कालावधीसाठी देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता निम्नत्तम निविदाकार मे. भूमी ग्रीन एनर्जी यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले दर रु. ७७२/- प्रति मे. टन ला मान्यता देण्याचा आणि त्यांना Letter of Acceptance देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.